


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN
Digital TV & Broadband Services



संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

वर्ष २ रे | अंक : ६४३. वा | शनिवार | दि. ०६ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# महाराष्ट्रात शासकीय रुग्णालयांमध्ये आता नो रेफरन्स-आरोग्य मंत्री तानाजी सावंत...

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांमध्ये निश्चितपणे दर्जेदार उपचार मिळतात. तिथे काम करणाऱ्या डॉक्टरांची गुणवत्ता खासगी रुग्णालयांपेक्षा चांगली आहे. त्यामुळे सरकारी रुग्णालयांमध्ये कोणताही तज्ञ डॉक्टर रुग्णांना खासगी रुग्णालयांचा रेफरन्स देणार नाही. नो रेफरन्स बाबत धोरणात्मक निर्णय झाला असून, त्याची कडक अंमलबजावणी होणार आहे. कोणी डॉक्टर रेफर करताना अढळ्यास त्याच्यावर कारवाई होईल. रुग्णांना त्याच ठिकाणी उपचार मिळाले पाहिजेत, असा राज्य सरकारचा निर्धार असल्याची माहिती राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी दिली. पिंपरी-चिंचवड शहराचे लोकनेते आमदार दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने अटल महाआरोग्य विनामूल्य शिबीरचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन आरोग्यमंत्री डॉ. सावंत यांच्या हस्ते झाले. खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर माई ढोरे, माजी उपमहापौर झामाबाई बारणे, माजी नगरसेवक उषा मुंढे, संतोष कांबळे, शशिकांत कदम, () बाबासाहेब त्रिभूवन, शारदा सोनवणे, सविता खुळे, करुणा चिंचवडे, सुरेश भोईर, संदीप कस्पटे, अभिषेक बारणे, सागर आंघोळकर, आरती चोंधे, अंबरनाथ कांबळे, योगिता नागरगोजे, मनिषा पवार, विनायक गायकवाड, हर्षल ढोरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष तुषार हिंगे, भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडिगेरी, संजय मंगोडेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, माजी स्वीकृत नगरसेवक विठ्ठल भोईर, महेश जगताप, संदीप गाडे, संदीप नखाते, कुणाल लांडगे, विनोद तापकीर, संजय कणसे, शर्मिला पवार, गोपाळ माळेकर, पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य भारती विनोदे, काळूराम नढे आदी उपस्थित होते. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ आणि संशोधन केंद्रांनी शेतकऱ्यांचे नैसर्गिक शेती करण्याबाबत जागृती करावी. रासायनिक खतांच्या वापरामुळे कॅन्सरसारख्या आजाराचे प्रमाण वाढले आहे. केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता ग्रामपंचातीचा सरपंचापासून प्रत्येकाची जबाबदारी आहे. पाणी प्रदूषण, जमीन प्रदूषणासाठी रोखण्यासाठी प्रशासन, सरकार आणि लोकांनी एकत्रित प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे डॉ. सावंत म्हणाले. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, महाराष्ट्रात कॅन्सरचे रुग्ण सर्वाधिक आहेत. त्याचे कारण अशुद्ध पाणी पुरवठा आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने पाणी पुरवठा आणि नदी संवर्धनासाठी पाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची आवश्यकता आहे. अटल महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून अनेक कुटुंबाना धीर देण्याचे काम झाले आहे. ही खऱ्या अर्थाने स्व. लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली ठरली आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, दिव्यांग व्यक्तींसाठी वर्षभर उपचार सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. केंद्र शासन व राज्य शासनाच्या योजनांची



अंमलबजाणी केली आहे. जिजाऊ क्लिनिक सुरू केली आहेत. शहरात १ हजार ५०० हून अधिक वैद्यकीय कर्मचारी नागरी आरोग्यासाठी काम करीत आहोत. नामवंत शासकीय व खासगी हॉस्पिटल्स या शिबिरात सहभागी झाले आहेत. महापालिका प्रशासनाच्या भोसरी, आकुर्डी आणि जिजामाता हॉस्पिटलचा समावेश महात्मा फुले जनआरोग्य योजनेत सहभाग करावा, ज्यामुळे जास्तीत-जास्त रुग्णांना लाभ होईल. महापालिका प्रशासन एकूण अर्थसंकल्पातील १० टक्केहून अधिक निधी आम्ही आरोग्यासाठी खर्च करीत आहोत. थेरगाव येथे पीपीपी तत्वार कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही नागरिकाला मोफत उपचार : शहराध्यक्ष शंकर जगताप शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, गेल्या ९ वर्षांपासून प्रत्येक वर्षी किमान दीड ते दोन लाख रुग्णांची तपासणी केली जाते. त्याचा फॉलोअप वर्षभर केला जातो. गतवर्षी १५६ लोकांची एंजिओग्राफी केली होती. त्यामध्ये ७६ जणांची एंजिओप्लास्टी मोफत करण्यात आली. दिव्यांगांसाठी मोफत जयपूर फूट, चष्मे, कान-नाक-घसा तपासणी यासह बहुतेक आजारांसाठी मोफत तपासणी व उपचार दिले जातात. गतवर्षी १७ कॅन्सर रुग्णांना मोठ्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचार दिली. १५० हून अधिक रुग्णालये आणि सुमारे २ हजार डॉक्टर यंदा शिबिरासाठी काम करणार आहेत. यावर्षी मोफत एक्स-रे, सोनोग्राफी, रक्ताच्या सुमारे १६० चाचण्या मोफत होणार आहेत. सुमारे ५ हजार लोकांचा डायलेसिस करण्याचा नियोजन केले आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही रुग्णाला मोफत उपचार मिळणार आहे.

## दुकानासमोर का बसला या कारणावरून तरूणाला केली बेदम मारहाण...

**जनसंचलन/ खामगाव**

दुकानासमोर का बसला, असे हटकले म्हणून तरुणाला लाठ्या- काठ्यांनी व फायटरने बेदम मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळ-गाव काळे येथे ४ जानेवारी रोजी रात्री घडली. याबाबत जळगाव जामोद पोलिसांनी रात्री उशिरा चौघांविरुद्ध गुन्हे दाखल केले. कृष्णा अरुण भोपळे (वय २७) याने पोलिसात तक्रार दिली आहे. त्याच्या काकाचे गावात दुकान आहे. या दुकानासमोर ज्ञानेश्वर जाधव हा बसला होता. त्याला रात्री उशिरापर्यंत दुकानासमोर बसू नको, असे समजावून सांगत असताना गावातीलच रितेश रतन उमाळे, सोपान घटे, पीयूष काळपांडे, रा-हुल उंबरकर यांनी संगनमत करून कृष्णासोबत वाद केला. ज्ञानेश्वर याला यापुढे बोलल्यास जिवानिशी मारून टाकू, अशी धमकी दिली. आरोपी रितेश उमाळे याने कृष्णाला फायटरने मारून जखमी केले. सोपान आणि पीयूष यांनी खाली पाडून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. राहुलने कृष्णाला पीव्हीसी पाईपने बेदम मारून अश्लील शिवीगाळ केल्याचे म्हटले. हा वाद रात्री गावात झाल्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. याबाबतच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी रितेश उमाळे, पीयूष काळपांडे, सोपान घटे, रा-हुल उंबरकर (सर्व रा. पिंपळ-गाव काळे) यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल (पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतून जिल्हा १०० टक्के साक्षरतेसाठी प्रयत्न...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा साक्षरतेसाठी अक्षर ओळख व अंकज्ञान निरक्षरांची नोंदणी करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देणे आणि जनजागृती करून निरक्षरांची नोंद गाव अथवा वार्ड किंवा जवळच्या शाळा मुख्याध्यापकांकडे करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने साक्षरता वर्ग घेण्यात येणार असून, नवभारत साक्षरता कार्यक्रम सर्वेक्षणाच्या माध्यमातून जिल्हा १०० टक्के साक्षरतेसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे शिक्षणाधिकारी (योजना) डॉ. वैशाली ठग यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने राज्यभर नवभारत साक्षरता कार्यक्रम योजना राबविण्याचे धोरण स्वीकारले असून, दोन शासन निर्णयामध्ये योजनेचे स्वरुप व अंमलबजावणी पद्धती व नियंत्रण यंत्रणेची जबाबदारी विशद केली आहे. त्यानुसार बुलडाणा जिल्ह्यातील १५ वर्षावरील वयोगटातील सर्व निरक्षरांना २०२७ पर्यंत साक्षर करण्याचे उद्दिष्ट असून, शाळा या योजनेचे एकक आहेत. योजनेच्या अंमलबजावणीसाठी यु-डाएस क्रमांकप्राप्त प्रत्येक व्यवस्थापनाची प्रत्येक माध्यमाची प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, आरोग्य विभागाचे आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, महिला व पुरुष बचत गट, माता व पालक संघ, शिक्षक पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, एन.जी.ओ, इयत्ता ८ वी व त्यापुढे शिकलेला विद्यार्थी, व्यक्ती ग्रामपंचायत, सरपंचाच्या सहकार्याने या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार असून, यामध्ये स्वयंसेवकाला कोणतेही मानधन मिळणार नाही. साक्षरता वर्ग ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पद्धतीने आहेत. प्रत्येक गाव, शहरातील लोकप्रतिनिधी, समाजसेवक, संघटनात्मक कार्य करणारे व्यक्ती मराठी, उर्दू व इतर भाषांचे संवर्धनाकरिता कार्य करणारे कार्यकर्ते, ग्रंथालय चालकांनी अधिक माहितीसाठी ९०४९७५००३१ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांचा बुलडाणा जिल्हा दौरा



**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्रीय श्रम, रोजगार, वन, पर्यावरण व जलवायू परिवर्तन मंत्री भूपेंद्र यादव यांचे शनिवार (दि.६) रोजी छत्रपती संभाजीनगर येथून देऊळगाव राजा तालुक्यातील आनंदगड येथे सकाळी ९.४० वाजता आगमन होईल. ते सकाळी १० वाजता सिनगार जहागीर येथे आगमन होईल. त्यानंतर श्री. देविदास महाराज संस्थान येथे सकाळी १०.३० वाजता आयोजित विकसित भारत संकल्प यात्राफ कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी १२.३० वाजता तृप्ती लॉन्स, धोत्रा नांदई फाटा येथे आगमन व राखीव. धोत्रा नांदई फाटा येथून दुपारी १ वाजता खामगाव तालुक्यातील जनुनाकडे प्रयाण करतील. केंद्रीय मंत्री श्री. यादव यांच्या हस्ते दुपारी २.४५ वाजता जनुना येथील अटल आनंदवन घन वन योजनेंतर्गत वृक्षारोपण करतील. खामगाव येथील वन परीक्षेत्र अधिकारी प्रादेशिक कार्यालयाचे दुपारी ३ वाजता त्यांच्या हस्ते लोकार्पण होईल. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता जिल्हा परिषद मुलींची शाळा येथील आयोजित विकसित भारत संकल्प यात्राफ कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ६ वाजता गजानन महाराज परिसर येथे आगमन होईल. शेगाव येथे रात्री मुक्कामी असतील.

केंद्रीय मंत्री श्री. यादव हे रविवार (दि.७) रोजी सकाळी ७.३० वाजता श्री. गजानन महाराजांचे दर्शन घेतील. त्यानंतर सकाळी ९.३० वाजता शेगाव येथून बावनवीरकडे प्रयाण करतील. बावनवीर येथे आयोजित विकसित भारत संकल्प यात्राफ कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी १२ वाजता संग्रामपूर येथील जलजीवन मिशनच्या प्रकल्पाचे त्यांच्या हस्ते भूमिपूजन होईल. त्यानंतर जळगाव जामोद मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

# प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेसाठी अर्ज आमंत्रित




**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेंतर्गत जोडणी नसलेल्या महिलांनी नजीकच्या गॅस एजन्सीमध्ये आवश्यक कागदपत्रे जमा करून, यासाठी लागणार १०० रुपयांचे शुल्क भरून घरगुती गॅस सिलेंडरसाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पत्रानुसार केंद्र शासनाने प्रधानमंत्री उज्वला योजनेअंतर्गत ७५ लाख अतिरिक्त गॅस जोडण्या मंजूर करण्याचा निर्णय घेतला असून, त्याअनुषंगाने जिल्हा उज्वला समितीही स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे अद्यापही गॅस जोडणी नसलेल्या महिलांनी तात्काळ आवश्यक कागदपत्रांसह जवळच्या कोणत्याही गॅस एजन्सीकडे अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज करताना राशन कार्ड, आधारकार्ड (कुटुंबातील सर्व व्यक्तीचे १८ वर्षावरील), बँक पासबुक झेरॉक्स (महिला राष्ट्रीयकृत बँकेचे), तीन फोटो (पासपोर्ट), मोबाईल नंबर, केवायसीसाठी अर्जदार स्वतः हजर असावा आणि प्रधान मंत्री उज्वला योजनेसाठी १४ पॉईंटचे हमीपत्र भरून देणे लाभार्थ्यास आवश्यक आहे. प्रधानमंत्री उज्वला योजनेअंतर्गत विस्तारीत योजना १ यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील, १ लाख ८९ हजार ३४७ लाभार्थ्यांना लाभ मिळाला असून, प्रधानमंत्री उज्वला योजना विस्तारीत-२ मध्ये आतापर्यंत ८ हजार ६९४ लाभार्थ्यांना जोडणी देण्यात आली आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांनी त्वरीत आपल्या जवळच्या कोणत्याही गॅस एजन्सीसोबत संपर्क साधून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# महिलांनी प्रत्येक चळवळीत सहभाग घेतला पाहिजे :- प्रदेशाध्यक्षा नंदिनी टारपे...

**जनसंचलन / बुलढाणा**

महिलांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी संपूर्ण आयुष्य पणाला लाऊन स्त्री शिक्षणासंबंधी महत्व-च्या वाटा असणाऱ्या सावित्रीबाई याचे कार्य आपल्या समाजासाठी बहुमूल्य आहे. त्यांचे विचार अंगीकरण्याचे आज काळाची गरज आहे. असे प्रतिपादन आदिवासी विकास परिषदेच्या महिला अध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या प्रदेश सचिव नंदिनी टारपे यांनी केले. स्वातंत्र्य पूर्व काळात चूल आणि मुलं या चाकोरीत जीवन व्यतीत करणारी स्त्री आजच्या आधुनिक युगात प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवताना दिसत आहे, व पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत असताना दिसत आहे, आज स्त्री अंतराळात झेप घेत आहे तसेच नामांकित क्षेत्रात सक्षम पणे अमूल्य योगदान देत आहे.हे फक्त ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या मुळे झाले आहे, तसेच आता या देशाचे संविधान वाचविण्याची वेळ आली आहे, त्यामुळे सर्व आदिवासी व मागासवर्गीय महिलांनी प्रत्येक चळवळीत व आंदोलनात सहभाग घेऊन संविधान वाचविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.सावित्रीबाईचे कार्य समाजाप्रती अनमोल आहे असे अध्यक्षयी भाषणात बोलतांना नंदिनी टारपे म्हणाल्या.. सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमाचे आयोजन ३ जानेवारी रोजी बुलडाणा उपासिका संघ परिवाराकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन तार कॉलनी येथे करण्यात आली. या प्रसंगी सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. या प्रसंगी व्यापीठीवर अध्यक्ष म्हणून आखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या प्रदेशसचिव नंदिनी टारपे होत्या,प्रमुख पाहुणे म्हणून निरजताई, कुणाला पैठणकर,अर्चना जाधव, उपस्थित



होते. सावित्रीबाई फुलेच्या जीवन कार्य तसेच जीवनातील विविध पैलूवर कुणाला पैठणकर यांनी प्रकाश टाकला. प्रास्तविक भाषण निरजताई यांनी केले. ,या कार्यक्रमाचे संचलन ज्योतीताई आराख यांनी केले तर आभार प्रदर्शन मोरेताई यांनी केले . या प्रसंगी शिला खरात, वैशाली मोरे, पूजा इंगळे, वैशाली आराख, काळे मॅडम, , सविता काळे, वैशाली वाकोडे,संध्या गवई, जया ताजने, खिल्लारे ताई, सुनीता नरवाडे,म्हस्के मॅडम मंदा निरज,मायावती नरवाडे,विमल तेलगोटे,छायाकटारे,रेखा,कमल साळवे,शारदा सरदार,सिंधू धेंवंदे, आदी मान्यवर व परिसरातील महिला मोठ्याप्रमाणात उपस्थित होत्या.

# वडाळी येथील लिटिल स्टार इंग्लिश स्कूल येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

**वृत्तसंस्था/अमरावती**



लिटिल स्टार इंग्लिश स्कूल, वडाळी अमरावती येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करून अभिवादन करण्यात आले. यामध्ये मा. मुख्यमंत्री यांनी दिलेला संदेश वाचून दाखविण्यात आला तसेच सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची व त्यांनी घेतलेल्या परिश्रमाची माहिती सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आली. जयंती कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष प्रेम मंडपे, अमित नाईक, चंद्रभान मंडपे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे सचिव श्री. जगदीश मंडपे, मुख्याध्यापिका रागिनी धोंगडे मंडपे यांनी माता सावित्रीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन शाळेच्या वतीने अभिवादन केले व सावित्रीबाई व महात्मा ज्योतिरावांनी सांगितल्याप्रमाणे त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करुन आपले मनोगत व्यक्त केले. जयंती कार्यक्रमाला शिक्षक वृंद, ममता ठाकूर, वंदना बनस-ोड, विद्या शास्त्रकर, कल्पना मॅडम, वैशाली कडू, पुनम घोडेस्वार, राखी सोहा खान, परिणीती मंडपे, दीक्षा धानोरकर, रेवती नाईक, राधिका चाचरकर योगेश्वरी धाडसे, उन्नती पतंगराव, नैतिक सरवरे अंशुमन ढोले आयुष मुंजाळे, आदित्य लोहांडे, कैवल्य साहारे रिदीक सुरजुसे, अंशुमन कोपरे, अभिराज नाईक तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विद्या शास्त्रकर यांनीए तर आभार प्रदर्शन कल्पना वानखेडे यांनी केले.

# जिल्ह्यातील मन, तोरणा आणि पैनगंगेतील गाळ काढण्यासाठी खासगी संस्थांना आवाहन

## सामाजिक दायित्व निधीतून काढणार गाळ जिल्हाधिकारी किरण पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**



जिल्ह्यातून वाहणा-या मन, तो-रणा व पैनगंगा नद्यांच्या पात्रातील गाळ काढण्यासाठी जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील यांत्रिकी संघटना, अशासकीय संस्थेच्या मदतीने खाजगी कंपन्यानी सामाजिक दायित्वाच्या निधीतून तो काढावा, यासाठी या संघटना आणि संस्थांनी पुढे येण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. जिल्ह्यातील मन ३८ हजार ४७०, तोरणा २३ हजार ४२५ आणि पैनगंगा नदीतून १ लाख ९४ हजार ५२५ घन मीटर गाळ काढण्यात येणार आहे. गाळ काढण्याचे काम अधिक जलदगतीने पूर्ण करण्याच्या दृष्टिकोणातून अशासकीय संस्था आणि खासगी संस्थेच्या मदतीने यंत्रसामग्री (परिचलनासाठी आवश्यक मनुष्यबळासह) तसेच त्यासाठी ला-गणारे पेट्रोल, तेल, वंगण या सर्वांची उपलब्धता करून देत असल्यास त्यांना तसे काम क्षेत्रीय कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या देखरेखीखाली करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

बुलढाणा जिल्ह्यातून वाहणा-या मन, तोरणा व पैनगंगा नद्यांच्या पूरप्रवण क्षेत्रातील बाधीत होणा-या शहरी भागा-तील पुराचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टिने तसेच नद्यांची वहन क्षमता पुनस्थापित करण्याच्या दृष्टिने नदीप-त्रातील गाळ व राडारोडा तसेच तदीप-त्रात गाळामुळे निर्माण झालेली बेटे, नदीपात्रातील अडथळे ई. निष्कासित करण्यासाठी अशासकीय संस्था व खाजगी कंपन्यांनी पुढे येण्याचे आव-हन समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्या उपस्थितीत शासकीय योजनांचा जागर...

## विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासकीय योजनांची जनजागृती

**जनसंचलन /बुलढाणा**

विविध योजनेंतर्गत पात्र असलेल्या परंतु लाभ न मिळालेल्या वंचित लोकांपर्यंत विविध योजनेचे लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनामार्फत जिल्ह्यात ङ्गविकसित भारत संकल्प यात्रेफ्ने २६ जानेवारीपर्यंत आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजनांचा जिल्ह्यातील ग्रामीण नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वेळोवेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने केले आहे. आयुष्यमान भारत, पीएम गरीब कल्याण अन्न योजना, दीनदयाल अंत्योदय योजना, पीएम आवास योजना, पीएम उज्वला योजना, पीएम विश्वकर्मा, पीएम किसान सम्मान, किसान क्रेडीट कार्ड (केसीसी), पीएम पोषण अभियान, हर घर जल-जल जीवन मिशन, स्वामित्व, जन धन योजना, जीवन ज्योती बीमा योजना, सुरक्षा बीमा योजना, अटल पेन्शन योजना, पीएम प्रणाम आणि नॅनो फर्टीलायझर आदी योजनांचा या यात्रेमुळे नागरिकांना लाभ उपलब्ध होणार आहे. या संकल्प यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी केंद्रीय कामगार, श्रम आणि पर्यावरण, वने तसेच पर्यावरणीय बदल मंत्री भूपेंद्र यादव हे उद्या, शनिवार (दि.६)पासून जिल्ह्यात दोन दिवसांच्या दौ-यावर येत आहेत.

केंद्रीय मंत्री श्री. यादव यांच्या हस्ते उद्या शनिवार (दि.६) रोजी सिंदखेड राजा तालुक्यातील सिनगाव जागीर येथे सकाळी १०.३० वाजता केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या दालनाचे उद्घाटन होईल. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील खासदार प्रतापराव जाधव, आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, आमदार श्रीमती श्वेता-ताई महाले व सर्व प्रशासकीय यंत्रणेच्या प्रमुखांची उपस्थिती राहणार आहे. तत्पूर्वी प्रास्ताविकातून विकसित भारत संकल्प यात्रेबाबतची माहिती दिल्यानंतर प्रतिज्ञा घेण्यात येईल. कार्यक्रमस्थळी केंद्र शासनाच्या प्रमुख विविध योजनांची चित्रफितीच्या माध्यमातून माहिती नागरिकांना देण्यात येईल. त्यानंतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना योजनांचे लाभ वितरीत करण्यात येणार आहेत. यावेळी ङ्गमेरी कहानी मेरी जुबानीफ्च्या माध्यमातून लाभार्थी आपले मनोगत व्यक्त करतील. या अनुषंगाने आमदार राजेंद्र शिंगणे आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव हे नागरिकांना केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करतील. सदर कार्यक्रमानंतर खामगाव नगर पालिका येथील कार्यक्रमात आमदार अ‍ॅड आकाश फुंडकर, आमदार डॉ. संजय कुटे व श्रीमती श्वेताताई महाले आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव हे नागरिकांना केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी खामगाव तालुक्यातील जनुना येथे २.३० वाजता ङ्गअटल आनंद वन घन वन योजनाफ आणि ङ्गमियावाकी पद्धतीफ्च्या घनदाट झाडांच्या प्रकल्पाचे मान्यवरांच्या हस्ते उदघाटन होईल. त्यानंतर दुप-ारी ३ वाजता वन परीक्षेत्र अधिकारी प्रादेशिक कार्यालयाचे लोकार्पण होईल. दुसऱ्या दिवशी रविवार (दि. ७) रोजी सकाळी केंद्रीय मंत्री श्री. यादव यांच्या हस्ते संग्रामपूर तालुक्यातील बावन-वीर येथे सकाळी १०.३० वाजता केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या दा-लनाचे उदघाटन आयोजित केले आहे. यावेळी माजी मंत्री, आमदार डॉ. संजय कुटे, अ‍ॅड आकाश फुंडकर, श्रीमती श्वेताताई महाले आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव हे नागरिकांना केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करतील. संकल्प यात्रेच्या माध्यमातून जिल्ह्या-तील सर्व ग्रामपंचायतीत जावून लाभ न मिळालेल्या वंचित नागरिकांना केंद्र व राज्याच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येणार असून, नाव नोंदणी करण्यात येणार आहे. या संकल्प यात्रेच्या माध्यमातून नागरिकांनी लाभ प्राप्त करून घ्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# राहुल गांधींच्या दुसऱ्या यात्रेचे नाव बदलले, १५ राज्ये-१०० हून अधिक लोकसभा मतदारसंघ यात्रा कव्हर करणार...

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

येत्या १४ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या व २० मार्च रोजी सांगता होणाऱ्या, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या- इम्फाळ ते पोरबंदर दरम्यानच्या दुसऱ्या यात्रेचे नाव काँग्रेसने गुरुवारी बदलले. आता याचे नाव भारत जोडो न्याय यात्रा असे राहणार आहे. भारत जोडो न्याय यात्रेअंतर्गत राहुल गांधी ६६ दिवसांत ६ हजार ७०० किलोमीटरचा प्रवास करणार आहेत. १५ राज्ये आणि १०० हून अधिक लोकसभा मतदारसंघांचा यात समावेश असेल. भारत जोडो यात्रेमुळे राहुल गांधी यांच्याकडे पाहण्याचा अनेकांचा दृष्टिकोन बदलल्याचा तसेच मनमिळाऊ आणि गंभीर राजकारणी, अशी त्यांची प्रतिमा लोकांमध्ये निर्माण झाल्याचा दावा काँग्रेस नेते करत आहेत.भारत जोडो न्याय यात्रेला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी इंडिया आघाडीचे सर्व मुख्यमंत्री इम्फाळमध्ये उपस्थित राहणार असल्याचाही दावा काँग्रेसने केला. ज्यांचे काँग्रेसशी संबंध दिवसेंदिवस बिघडत आहेत त्या अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षासह नितीशकुमार, ममता बॅनर्जी आदींना यात्रेच्या उद्घाटनाला बोलावले आहे का? या प्रश्नावर पक्षनेते जयराम रमेश यांनी, इंडिया आघाडीतील सर्व पक्षांना आमंत्रित करण्यात आले आहे व केजरीवाल हे(देखील) या आघाडीचा भाग आहेत, असे सावध उत्तर दिले.अनेक महिन्यांच्या वांशिक हिंसाचारानंतर सामान्य स्थितीची वाट पाहणाऱ्या मणिपूरमधून रविवारी (१४ जानेवारी) राहुल गांधींची भारत जोडो यात्रा -२ सुरू होईल. महात्मा गांधींचे जन्मस्थान गुजरातमधील पोरबंदर येथे यात्रेची सांगता होणार आहे. या ६६ दिवसांच्या व ६७०० किलोमीटरच्या भारत न्याय यात्रे ला आता पहिल्या यात्रेतील जोडो हा शब्दही जोडला गेला आहे. रमेश म्हणाले की गेल्या वर्षीच्या भारत जोडो यात्रे मुळे निर्माण झालेला प्रभाव पुन्हा निर्माण करण्यासाठी पक्षाने नव्या यात्रेच्या नावात जोडो शब्द जोडण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, गेल्यावेळेप्रमाणे ही पूर्णतः पदयात्रा असणार नाही तर काही भागांसाठी बसचा वापर करेल. अर्थात राहुल स्वतः



पदयात्राच करतील पण बसबाबतचा बदल पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या प्रकृतीविषयीच्या काळजीतून घेतल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

## जितेंद्र आव्हाड यांनी केलेले वक्तव्य हे मूर्खपणाचे - देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया...

वृत्तसंस्था/पुणे

जितेंद्र आव्हाड यांनी प्रभू श्रीराम यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध संपूर्ण राज्यातून व्यक्त केला जात आहे. त्यात सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नो कमेंट्स अशी प्रतिक्रिया दिली होती. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली असून जितेंद्र आव्हाड यांनी केलेले वक्तव्य हे मूर्खपणाचे आहे.बदनाम हुए तो क्या हुआ नाम तो हुआ अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

पिंपरी चिंचवड येथे भाजपचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त अटल विना मूल्य माहा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिराला भेट दिल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी फडणवीस म्हणाले की, पुण्यात झालेली हत्या ही त्याच्या साथीदाराने केलेली आहे. कुठलाही गँगवॉर होणार नाही. कुख्यात गुंड कुठलाही असो त्याचा बंदोबस्त या शासनात केला जातो. त्यामुळे कुठलाही प्रकारचा गँगवॉर करण्याची कुणीही हिम्मत करणार नाही.भाजप आमदार दिलीप कांबळे यांनी पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण केली त्यावर फडणवीस म्हणाले की, मी रायगडला कार्यक्रमाला होतो. त्यावेळी मला उडत उडत माहिती समजली. मात्र माझं त्यांच्याशी अद्याप बोलणे झालेले नसल्याचे फडणवीस म्हणाले आहेत. लक्ष्मण भाऊंचे सगळे स्वप्न भाजप पूर्ण करेल. आता आमची महायुती आहे आणि महायुतीचा शब्द



पूर्ण करण्याचे काम आम्ही करणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. जितेंद्र आव्हाड यांनी केलेले वक्तव्य हे मूर्खपणाचे असून प्रभू श्रीराम हे सर्वोच्च आहेत. विनाकारण लोकांच्या भावनांना ठेच पोहचवण्याचे काम आहे. जे लोक स्वतः ला हिंदुत्ववादी म्हणवतात ते मात्र यावर मौन धारण करून बसले असल्याचे फडणवीस म्हणाले आहेत.

## शिष्यवृत्तीतील उर्वरित रक्कम विद्यार्थ्यांनी सात दिवसात जमा करावी

जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासनाने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार केंद्र शासनाची ६० टक्के हिश्श्याची रक्कम महाडीबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना आधार संलग्न बँक खात्यात जमा झाल्यानंतर अनुज्ञेय निर्वाह भत्ता वजा करून उर्वरीत शिक्षण शुल्क, परीक्षा आणि इतर शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयास ७ दिवसात जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची सन २०२१-२२ व



२०२२-२३ वर्षातील केंद्र शासनाची ६० टक्के रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. खात्यात जमा झालेल्या रकमेतून अथवा काही दिवसात जमा होणार आहे अशा विद्यार्थ्यांनी त्या रकमेतून निर्वाहभत्याची ६० टक्के वजा करून उर्वरीत रक्कम महाविद्यालयात जमा करावी, असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहायक आयुक्तांनी केले आहे.

## शासकीय मदत थांबवली असल्यास लेखी तक्रार करा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/ बुलढाणा

यंदा जिल्ह्यात शासनाने दुष्काळ घोषित केल्यामुळे बँकांनी शेतक-यांना शासकीय लाभापासून वंचित ठेवू नये, असे आदेश जिल्हा प्रशासनाने सर्व बँकांना दिले आहेत. तरीही बँकांकडून असे होत असल्यास (होल्ड लागला असेल) शेतकऱ्यांनी यासंदर्भात संबंधित तहसील आणि अग्रणी बँकेकडे लेखी तक्रार करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. यावर्षी शासनाने दुष्काळ घोषित केला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोणतीही बँक कृषी कर्जाची सक्तीची वसुली करणार नाही. खरीप हंगामामध्ये पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करता येणार असून, पीक कर्ज घेताना बँकांनी सीबील स्कोरची अट लावू नये. त्यामुळे शेतकरी स्वेच्छेने नवीन कर्ज घेऊ शकतील, असेही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सांगितले आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना ही सर्व पात्र नागरिकांना अनिवार्य असून खातेधारकांनी त्यासंबंधी बँकेकडे चौकशी करावी. तसेच व्यवसायासाठी कर्जाची आवश्यकता असल्यास प्रधान मंत्री मायक्रो फूड प्रोसेसींग इंटरप्रायजेस (पीएमएफएमइ) किंवा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) योजनेमध्ये अर्ज करावा व त्यासंदर्भात चौकशीसाठी पीएमएफएमइबाबत तालुका कृषी अधिकारी आणि सीएमईजीपीसाठी जिल्हा उद्योग केंद्रांशी संपर्क




साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. तसेच सर्व शेतक-यांनी आपले आधार बँक खात्याशी लिंक करुन घ्यावे व वारंवार आपली बँक तसेच मोबाइल नंबर बदलू नये, असे आवाहन त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स


वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| 8x8 cm (Hight 8 cm, Width 8 cm) | 5x8 cm (Hight 5 cm, Width 8 cm) | 5x8 cm (Hight 5 cm, Width 23 cm) |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |

**एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| | | |
|---|---|---|
| 2600/- (Hight 12 cm, Width 12 cm) | 1800/- (Hight 8 cm, Width 10 cm) | 1300/- (Hight 8 cm, Width 8 cm) |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही निःशुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्कः

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com